मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षा जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कम्पुटर या पदावरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यका-च्यां पदावर निवडीने भरण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय क्र. परिक्षा १०८९/सीआर२६४/८९/१३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८. डिसेंबर १९८९

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा [सेवा प्रवेश] नियम १९६७ मधील तरतुदीनुसार जिल्हा सेवा [वर्ग ३][लिपिक वर्गीय] श्रेणी-तीन, या संवर्गातील वरिष्ठ सहाय्यकाची पदे पदोन्नतीने, निवडीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ५०:२५:२५ या प्रमाणात भरता येतात. निवडीने भरावयाची पदे विभागीय आयुक्तांनी घेतलेला स्पर्धात्मक स्वरुपाच्या मर्यादित परिक्षेच्या आधारे कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कॉम्प्युटर या कर्मचा-यांमधून निवड करुन भरण्याची तरतूद उपरोक्त सेवा प्रवेश नियमात आहे. सेवा प्रवेश नियमात केलेल्या तरतुदीनुसार उपरोक्त कर्मचा-यांसाठी मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. आता शासन असे आदेश देत आहे की, वरिष्ठ सहाय्यकाची पदे, कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कॉम्प्युटर यांच्यामधून निवडीने भरण्यासाठी खालील अभ्यासक्रम पुस्तकाशिवाय असलेल्या मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा विहित करण्यात येत आहे.

अभ्यासक्रम

| | | |
|---|---|---|
| प्रश्न पत्र १ [गुण:१००] | [अ] संक्षेप लिखाण [ Precis writing ] | ४० गुण |
| | [आ] टिप्पण्या व पत्रव्यवहार यांच्या समावेश असलेली कार्यालयीन पत्रव्यवहाराची साधी प्रकरणे ( Official corresperce in simple matters including Noting and Drafting) | ६० गुण |
| प्रश्नपत्रिका २ [गुण:१००] | [अ] सचिवालयीन आदेश [ Sectt Insturctions) | ३० गुण |
| | [आ] कार्यालयीन पध्दतीची नियमपुस्तिका [ Manual of Office Procedure ] | ४० गुण |
| | [इ] कामकाज विषयक नियम व त्या संबंधित दिलेल्या सूचना. [ Rules of Business and Instructions issued there under ) | ३० गुण |

जिल्हा परिषद ... आवक
२६ DEC 1989
जिल्हा परिषद ... दिनांक ... दस्तावरी ... आवक

३. अर्हता :- जिल्हा सेवा [वर्ग तीन][लिपिक वर्गीय] श्रेणी तीन संवर्गातील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कॉम्प्युटर या पदावर ज्या कर्मचा-यांच्या सेवा नियमित नियुक्तीच्या

.....२

तारखेपासून म्हणजे प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ पुरस्कृत उमेदवारांच्या बाबतीत, त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून व त्यांच्या सेवा अन्य कारणास्तव नियमित झाली आहे. त्यांच्या बाबतीत सेवा नियमित केल्यासंबंधीच्या जिल्हा परिषदेच्या आदेशाच्या दिनांकापासून तसेच पदोन्नत कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या नियमित पदोन्नतीच्या दिनांकापासून ज्या वर्षी उपरोक्त परिक्षा घेण्यात येईल. त्या वर्षाच्या पहिल्या जानेवारी रोजी सात वर्षे पूर्ण झालेली आहे व सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण असलेले फक्त योग्य कर्मचारी सदर परिक्षेस बसण्यास पात्र असतील.

४. संबंधित विभागीय आयुक्त यांनी आपल्या विभागातील उपरोक्त कर्मचा-यांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सदर परिक्षा घेण्याची कार्यवाही करावी. ही परिक्षा दरवर्षी नोव्हेंबर/डिसेंबर मध्ये घ्यावी. परिक्षा जाहीर करतेवेळी विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागात एकूण किती जागा ह्या परिक्षेस उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांसाठी आहेत हे जाहीर करावे. तसेच परिक्षेच्या प्रश्न पत्रिका तयार करण्याची कार्यवाही संबंधित विभागीय आयुक्तांनी करावी.

५. विभागीय आयुक्त व जिल्हा परिषद कार्यालयांना तसेच संबंधित कर्मचा-यांना मार्गदर्शनासाठी व कार्यवाहीसाठी पुढील सूचना देण्यात येत आहेत.

(एक) विभागीय आयुक्तांना केवळ योग्य उमेदवारांना प्रवेश देणे शक्य व्हावे. ह्या दृष्टिने संबंधित जिल्हा परिषदांनी उमेदवारासंबंधीची शैक्षणिक पात्रता, वय, जात-जमात, निवास इत्यादि बाबतची माहिती त्यांना योग्य पुराव्यावरुन तपासून पाठविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उमेदवाराचा गोपनीय अभिलेख पाहून तो समाधानकारक असल्याबद्दलची ग्वाही देणे हे मुद्दा आवश्यक आहे.

(दोन) उमेदवारांच्या उपयोगासाठी विहित अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. विभागीय आयुक्त यांनी अर्ज पाठविण्याचा काही कालावधी ठरवावा. त्या मुदतीपर्यंत कर्मचा-यांकडून विहित केलेल्या नमुन्यात अर्ज भरुन जिल्हा परिषदांतर्फे विभागीय आयुक्तांकडे पाठवावे. प्राप्त झालेले अर्ज विहित कालावधीत विभागीय आयुक्तांकडे पाठविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.

(तीन) जिल्हा परिषदांनी आवेदनपत्रे विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यापूर्वी उमेदवारांनी आवेदनपत्रात नमूद केलेली सेवा, शिक्षण, वय, जात, निवास इत्यादि बाबतच्या नोंदी मूळ कागदपत्रांशी पडताळून आणि संबंधित कर्मचा-याचे गोपनीय अभिलेख समाधानकारक असल्याची खात्री करुन त्यानुसार आवेदनपत्रावर नोंद घ्यावी. गोपनीय अभिलेखाच्या पडताळणीनंतर जे उमेदवार पदोन्नतीस पात्र नाहीत, असे दिसून येईल. त्यांची आवेदन पत्रे विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात येऊ नयेत, अशा प्राप्त असणा-या उमेदवारांची आवेदनपत्रे एकत्रितपणे जिल्हा परिषदेच्या पत्रासोबत विभागीय आयुक्तांकडे विहित कालावधी पर्यंत पाठविण्यात यावीत व पत्रासोबत उमेदवारांच्या नावाची यादी जोडावी. उमेदवारांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत. ती

विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यांत येऊ नयेत. विहित कालावधीनंतर जिल्हा परिषदांकडून पाठविण्यांत आलेले अर्ज विभागीय आयुक्त स्वीकारणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

[पाच] परिक्षेकरिता विषय व अभ्यासक्रम यांची माहिती परिक्षेस बसू इच्छिणाऱ्या जिल्हा परिषदेतील सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणण्यांत यावी.

[सहा] परिक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेत काढण्यांत येतील. मात्र ज्यांनी इंग्रजी भाषेत उत्तरे लिहिण्याचा पर्याय स्वीकारला असेल, त्यांच्या साठी प्रश्नपत्रिका २ चे इंग्रजी भाषांतर देण्यांत येईल. प्रश्नपत्रिका १ चे असे भाषांतर देण्यांत येणार नाही.

[सात] परिक्षेला प्रवेश देण्यांत आलेल्या प्रत्येक उमेदवाराला प्रवेश पत्र देण्यांत येईल. प्रवेश पत्र विभागीय आयुक्तांकडून जिल्हा परिषदांना परस्पर पाठविण्यांत येतील व ती उमेदवारांना त्यांच्या जिल्हा परिषदेकडून मिळतील. उमेदवाराने प्रवेशपत्र दाखविल्याशिवाय त्याला परीक्षेत बसू दिले जाणार नाही. एखाद्या उमेदवाराला परिक्षेस प्रवेश न देण्यांत आल्यास त्या- बाबतचे कारण जिल्हा परिषदांना कळविण्यांत येईल. परिक्षेसाठी प्रवेश अथवा परीक्षेबाबतच्या निकालासंबंधी उमेदवारांनी विभागीय आयुक्तांकडे केलेल्या पत्रव्यवहाराची त्या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही.

[आठ] परीक्षेचा संपूर्ण निकाल जिल्हा परिषदांना व ग्राम विकास विभागाला विभागीय आयुक्तांकडून पाठविण्यांत येईल. विभागीय आयुक्तांकडून परीक्षेचा निकाल प्रसिध्द करण्यांत येणार नाही. जिल्हा परिषदा पुढील कार्यवाही करतील.

[नऊ] विभागीय आयुक्त व जिल्हा परिषद कार्यालयाने प्रस्तुत सूचना संबंधितांच्या निदर्शनास आणाव्या अशी त्यांना विनंती करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे त्यांना अशीही विनंती करण्यात येत आहे की, ज्या उमेदवाराचे अर्ज विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यांत येतील, त्यांची यादी ग्राम विकास विभागाकडे देखील पाठविण्यांत यावी.

[दहा] प्रस्तुत परीक्षेत अर्हता प्राप्तीसाठी किमान गुणसंख्या विभागीय आयुक्त ठरवतील.

८. जिल्हा परिषदांचे वेतन व भत्ते" २०५३ जिल्हा प्रशासन-०९३, जिल्हा आस्थापना [ ] स्थानिक क्षेत्रातील योजना- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या १८३ अन्वये आस्थापना अनुदाने-[एक] पुनरिक्त अंशदायी पुंड-[२०५३०५६५]" या लेखा शिर्षाखाली करण्यात येतात. त्याच लेखाशिर्षाखाली परिक्षेचा खर्च खर्ची घालण्यात यावा व त्या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]

[ वै. चि. पेंसारे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- अर्जाचा नमुना

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त [दोन जादा प्रतींसह]
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र शासन विभाग,
... वरिष्ठ सहाय्यक लेखा निवड नस्ती,
... दालन ८२, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
निवड नस्ती.

# जोडपत्र

वरिष्ठ सहाय्यक पदावर निवडीने नेमणूक होण्यासाठी कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा .. पदावरासाठी मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा. कॉम्प्युटर

## आवेदन पत्र

१. संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) .. .. श्री/

२. विभाग/कार्यालयाचे नांव .. ..

३. विभागीय निवड मंडळाच्या शिफारशीनुसार प्रथम ज्या लिपिकवर्गीय पदावर नेमणूक झाली होती त्या पदाचे नाव ..

४. नेमणुकीचे श्रेणी व निकालातील अर्हता प्रमाणे ..

५. अखंडित नियुक्तीची तारीख .. ..

६. उमेदवार मागासवर्गीय आहे काय .. (महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या यादीप्रमाणे) असल्यास, जात, जमात व ज्या राज्याचा अधिवासी आहे त्याचे नाव.

७. पेपरातील उत्तरे लिहिण्याचे माध्यम (इंग्रजी किंवा मराठी)

अर्जदाराची सही